बैठक क्रमांक : 40683

उमेदवाराची सही :

# वनसंरक्षक, पुणे वन विभाग, पुणे

## 'शिपाई / माळी / पहारेकरी' पद भरती

रविवार, दि. १५ नोव्हेंबर २००९

वेळ : दुपारी ३.०० ते ४.१५

लेखी परीक्षा – एकूण गुण - ७५

सूचना :

१. उमेदवाराने प्रवेशपत्रावरील दिलेला बैठक क्रमांक प्रश्नपत्रिकेवर योग्य ठिकाणी नमूद करावा व सही करावी.
२. उमेदवाराने कोणत्याही परिस्थितीत प्रश्नपत्रिकेवर आपले नाव लिहू नये. तसे केल्यास उमेदवार अपात्र ठरविला जाईल.
३. प्रश्नपत्रिका ही बहुपर्यायी स्वरुपाची असून प्रत्येक प्रश्नासाठी ४ पर्याय दिले आहेत. प्रत्येक प्रश्नासाठी १ गुण आहे.
४. उमेदवाराने प्रश्नाचे उत्तर प्रश्नपत्रिकेतील योग्य त्या पर्यायाच्या क्रमांकावर ✓ अशी खूण करावी.

| उदाहरणार्थ : | १) पुणे | २) सोलापूर |
|---|---|---|
| | ३) नागपूर | ४) मुंबई |

५. प्रत्येक प्रश्नाचे चार पर्यायापैकी एकच उत्तर बरोबर आहे.
६. एकापेक्षा जास्त पर्यायाच्या क्रमांकावर अशी खूण केल्यास अथवा खाडाखोड केल्यास त्यास गुण दिले जाणार नाहीत.
७. खूण करण्यासाठी उमेदवाराने निळ्या अथवा काळ्या बॉलपेनचा वापर करावा
८. उमेदवाराने कॅलक्युलेटर, मोबाईल इत्यादिचा वापर करू नये. तसे केल्यास उमेदवार अपात्र ठरविला जाईल.
९. उमेदवाराने हॉलमध्ये शांतता राखावी. आजुबाजूला चर्चा करतांना आढळल्यास उमेदवार अपात्र ठरविला जाईल.
१०. उमेदवाराला पूर्ण वेळ संपल्यानंतरच हॉलच्या बाहेर जाण्यासाठी परवानगी दिली जाईल.

*0020100401*

पर्यवेक्षकाची सही :

Chief Accountant to the
Conservator of Forests
Pune Division, Pune

१. वाक्यातील ठळक शब्दाऐवजी विरुद्धार्थी शब्द निवडा.

सूर्याचा अस्त झाला.

(१) उदय (२) शेवट

(३) नाश (४) निर्माण

२. ग्रामपंचायतीच्या प्रशासनाचा प्रमुख कोण असतो?

(१) ग्रामसेवक (२) तलाठी

(३) पाटील (४) गटविकास अधिकारी

३. महाराष्ट्र एक्सप्रेस कोठून कोठपर्यंत धावते?

(१) नागपूर ते मिरज (२) गोंदिया ते मिरज

(३) नागपूर ते कोल्हापूर

(४) गोंदिया ते कोल्हापूर

४. झाडाचे वय कशावरून ठरवितात?

(१) झाडाच्या खोडावरील वर्तुळे

(२) झाडांची उंची

(३) पानांची संख्या

(४) झाडाची साल

५. खांद्याच्या सांध्याला काय म्हणतात?

(१) उखळीचा (२) बिजागरीचा

(३) खिळीचा (४) सरकता सांधा

६. पत्रातील 'चि.' या संक्षेपाचे पूर्ण रुप कोणते?

(१) चिमणा (२) चिरंजीव

(३) चिरतरुण (४) चिरायू

७. साप, मगर, सरडा, कासव, हे प्राणी कोणत्या वर्गात मोडतात?

(१) सरीसृप (२) उभयचर

(३) मत्स्य (४) जलचर

८. पुढील शब्दातून गुणवाचक विशेषण ओळखा.

(१) तोंड (२) बंड

(३) दयावंत (४) घर

९. द.सा.द.शे. १२% दराने एका रकमेचे ३ वर्षांचे सरळव्याज ५४० रुपये तर ती रक्कम किती?

(१) २१०० (२) १५००

(३) १८०० (४) १६००

Chief Accountant to the
Conservator of Forests
Pune Division, Pune

१०. 'कृत्रिम पाऊस पाडण्यासाठी राबविण्यात/ आलेल्या प्रकल्पास कोणत्या नावाने संबोधले जाते?

(१) प्रकल्प वर्षा (२) रेनफॉल प्रकल्प

(३) छाया प्रकल्प (४) कृपादृष्टी प्रकल्प

११. रब्बी हंगामाची सुरुवात कधी होते?

(१) १५ ऑक्टोबर (२) १५ जुलै

(३) १५ मार्च (४) १ जानेवारी

१२. पाच कोटी तीन लाख दहा हजार चारशे तीन ही संख्या अंकात लिहिण्याचा योग्य पर्याय निवडा.

(१) ५३१००४०३ (२) ५०३१०४३

(३) ५०३१०४०३ (४) ५३१०४०३

१३. घोड्याच्या घराला काय म्हणतात?

(१) ढोली (२) पागा

(३) पीलखाना (४) गोठा

१४. महाराष्ट्रातील कोणत्या जिल्ह्यात सर्वाधिक सहकारी साखर कारखाने आहेत ?

(१) पुणे (२) औरंगाबाद

(३) सोलापूर (४) अहमदनगर

१५. वैनतेय या शब्दाचा समानार्थी शब्द दर्शविणारा योग्य पर्याय निवडा.

(१) गरुड (२) वायस

(३) सारंग (४) मंडूक

१६. खालील शब्दसमुहाचा अर्थ स्पष्ट करणारा योग्य पर्याय निवडा.

''अनेक बाबींवर एकाच वेळी लक्ष ठेवणारा''

(१) अनावधानी (२) अष्टावधानी

(३) प्रतिगामी (४) सनातनी

१७. खालीलपैकी योग्य जोडी निवडा.

(१) 'अ' जीवनसत्व : डोळा

(२) 'ब' जीवनसत्व : त्वचा

(३) 'क' जीवनसत्व : केस

(४) 'ड' जीवनसत्व : रक्त

१८. खालीलपैकी कोणती एक गोदावरीची उपनदी नाही?

(१) वर्धा (२) वैनगंगा

(३) इंद्रावती (४) तेरखोल

१९. मद्याच्या अतिसेवनाचा दुष्परिणाम कशावर अधिक होतो ?

(१) यकृत (२) प्लीहा

(३) किडणी (४) लहान आतडे

२०. भीमाशंकर अभयारण्य ..... साठी प्रसिद्ध आहे?

(१) बिबट्या (२) शेकरू

(३) सांबर (४) माळढोक

२१. सरदार वल्लभभाई पटेल यांनी कोणता सत्याग्रह केला ?

(१) झेंडा सत्याग्रह (२) खेडा सत्याग्रह

(३) बार्डोलीचा सत्याग्रह (४) मिठाचा सत्याग्रह

२२. 'गुरुग्रंथसाहेब' यात कोणत्या संतकवीची पदे समाविष्ट आहेत?

(१) ज्ञानेश्वर (२) नामदेव

(३) एकनाथ (४) तुकाराम

२३. विसंगत घटक ओळखा.

(१) नगरपालिका (२) नगरपंचायत

(३) महानगरपालिका (४) केंद्र सरकार

२४. खालील वाक्यातील ठळक शब्दाची जात ओळखा.

अनिलने मला **दोन** रुपये दिले.

(१) नाम (२) विशेषण

(३) सर्वनाम (३) क्रियापद

२५. महाराष्ट्राच्या विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन ... येथे घेतले जाते.

(१) औरंगाबाद (२) मुंबई

(३) नागपूर (४) पुणे

२६. नारळाचा बीजप्रसार कोणामार्फत होतो?

(१) वारा (२) पाणी

(३) प्राणी (४) सूर्य

२७. महाराष्ट्रातील खालीलपैकी कोणते ठिकाण ज्योतिर्लिंगाचे स्थान नाही?

(१) भीमाशंकर (२) परळी-वैजनाथ

(३) त्र्यंबकेश्वर (४) लेण्याद्री

२८. ग्रामीण पोलीस पाटलाची नेमणूक करण्याचे अधिकार .... यांना आहेत.

(१) जिल्हा पोलीस अधीक्षक

(२) जिल्हाधिकारी

(३) तहसीलदार

(४) उपजिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी

२९. ... हे महाराष्ट्रातील औष्णिक वीज केंद्र आहे.

(१) खोपोली (२) तुर्भे

(३) कोराडी (४) कोयना

३०. दाबकलम ही प्रजननाची ... पद्धती आहे.

(१) शाकीय (२) लैंगिक

(३) नैसर्गिक (४) संयुग्मन

३१. राजू हा विजयपेक्षा ३ वर्षांनी लहान आहे. मोहन हा राजूपेक्षा २ वर्षांनी मोठा आहे. तर विजय हा मोहनच्या तुलनेत कसा आहे?

(१) १ वर्षांनी लहान (२) १ वर्षांनी मोठा

(३) ५ वर्षांनी लहान (४) ५ वर्षांनी मोठा

३२. चौरसाचा प्रत्येक कोन कसा असतो?

(१) लघुकोन (२) विशालकोन

(३) काटकोन (४) यापैकी एकही नाही

३३. खालीलपैकी कोणती जीवनप्रक्रिया प्राण्यांच्या जीवनात घडून येत नाही?

(१) श्वसन (२) प्रकाश-संश्लेषण

(३) प्रथिन-संश्लेषण (४) ग्लुकोज अपघटन

३४. खालील शब्दसमूहाबद्दल योग्य असणारा एक शब्द पर्यायातून निवडा.

सतत दुसऱ्यावर अवलंबून राहणारा -

(१) स्वावलंबी (२) बांडगूळ

(३) परावलंबी (४) घरकोंबडा

३५. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ कोणत्या शहरात आहे ?

(१) पुणे (२) नाशिक

(३) नागपूर (४) मुंबई

३६. अन्न पदार्थांना मोड आणणे आणि आंबविणे या प्रक्रियांमुळे अन्नातील ... या घटकांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होते.

(१) जीवनसत्त्वे 'अ' व 'ड'

(२) जीवनसत्त्वे 'ब' संयुक्त व 'क'

(३) जीवनसत्त्वे 'अ' व 'इ'

(४) जीवनसत्त्वे 'ड' व 'के'

Chief Accountant to the
Conservator of Forests

३७. महाराष्ट्रात ... जिल्ह्यात लोणार येथे खाऱ्या पाण्याचे सरोवर आहे.

(१) अकोला (२) यवतमाळ
(३) चंद्रपूर (४) बुलढाणा

३८. 'पुणे करार' कोणाकोणात झाला होता?

(१) आंबेडकर - राजर्षी शाहू
(२) आंबेडकर - पंजाबराव देशमुख
(३) आंबेडकर - सावरकर
(४) आंबेडकर - महात्मा गांधी

३९. महाराष्ट्राच्या विधानसभेत निर्वाचित सभासदांची संख्या .... आहे.

(१) २५० (२) २६६
(३) २८८ (४) २७८

४०. ट्वेंटी-२० क्रिकेट सामन्यात युवराज सिंगने एका षटकात सहा षटकार मारले. हा सामना कोठे खेळला गेला?

(१) पोर्ट एलिझाबेथ (२) केप टाऊन
(३) जोहान्सबर्ग (४) डर्बन

४१. गाईचा गाभणकाळ किती दिवस आहे?

(१) १८० (२) २८०
(३) ८० (४) १२०

४२. वन : लाकूड, खाण : खनिजे, तसे समुद्र :

(१) पाणी (२) जहाज
(३) लाटा (४) मीठ

४३. 'चर्पटमंजरी' अलंकारी शब्दाचा अर्थ सांगा.

(१) अर्थावीण पाठांतर (२) लांबणारे काम
(३) वायफळ बडबड (४) खरडपट्टी काढणे

४४. साडेसतराच्या निम्मी रक्कम म्हणजे किती?

(१) सव्वानऊ (२) साडेनऊ
(३) नऊ (४) पावणेनऊ

४५. महाराष्ट्रातील खालीलपैकी कोणता परिसर संत्र्यांच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध आहे ?

(१) मराठवाडा (२) कोकण
(३) मावळ (४) नागपूर

४६. २% दराने १२५० रु. घरभाड्यावर किती रुपये शैक्षणिक कर द्यावा लागेल?

(१) ५० (२) ५२
(३) २५ (४) १२.५

४७. 'गुलामगिरी' हा ग्रंथ कोणी लिहिला?

(१) लोकमान्य टिळक (२) धोंडो केशव
(३) महात्मा फुले (४) महात्मा गांधी

४८. शिवाजी महाराजांपूर्वी महाराष्ट्रात कोणाचे रा

(१) इंग्रज (२) मराठे
(३) पोर्तुगीज (४) निजामशहा व आ

४९. ३४.२३/३ = किती?

(१) १.११४ (२) ११४.१
(३) ११.४१ (४) ११.१४

५०. एका बगिच्यास कंपाऊंडसाठी २३५ खांब लागतात. प्रत्ये खांबाची किंमत २७ रु. असल्यास एकूण किती रुप लागतील?

(१) ६३४५ (२) ६२४५
(३) ६४२५ (४) ६५३५

५१. 'आवळ्याची मोट बांधणे' या म्हणीचा अर्थ स्पष्ट क पर्याय निवडा.

(१) आवळे एकत्र करणे.
(२) ओटीत घालणे.
(३) एकमेकांशी न जमणाऱ्या लोकांना एकत्र आणणे
(४) भांडण वाढवणे

५२. XXV ही रोमन संख्या चिन्ह कोणती संख्या दर्शविते

(१) २१ (२) २५
(३) २२ (४) २३

५३. 'काळी वन पितोळी' या शब्दात जी म्हण दडली आ तिच्या योग्य अर्थाचा पर्याय निवडा.

(१) मागून घोडे नाचवणे
(२) मदत केली त्याची स्तुती करणे
(३) बलवान माणूस सत्ता गाजवतो
(४) खूप कष्ट करणे.

५४. चंद्र काय आहे?

(१) तारा (२) ग्रह
(३) चांदणी (४) उपग्रह

५५. ४ तास ३० मिनिटे म्हणजे किती मिनिटे?

(१) २७० (२) ४३०
(३) ३९० (४) २४०

५६. एक हजार एकशे मधून किती वजा करावेत, बाकी एकशेबारा उरेल?

(१) ९९९ (२) ९८८
(३) ९९७ (४) १०००



Chief Accountant to the
Conservator of Forests

५७. १/९ + ६/९ = किती?

(१) ६/९ (२) ५/९
(३) ३/१२ (४) ७/९

५८. समानार्थी शब्दांची बरोबर जोडी ओळखा.

(१) मनकवडा - बहिर्मुख
(२) अल्पसंतुष्ट - समाधानी
(३) बोलघेवडा - बडबड करणारा
(४) उदयोन्मुख - जुन्या वळणाचा

५९. अवयवांच्या कामात सुसूत्रता ठेवण्याचे काम कोण करते?

(१) मेंदू (२) आंतरइंद्रिय
(३) डोळे (४) हातपाय

६०. सन .... मध्ये महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले.

(१) १९५० (२) १९५६ (३) १९४९ (४) १९६०

६१. पचनक्रियेनंतर पिष्टमय पदार्थाचे रुपांतर कोणत्या पदार्थात होते?

(१) प्रथिने (२) अविद्राव्य घटक
(३) कणीक (४) साखर

६२. हा अवयव वनस्पतीचे अन्न तयार करतो?

(१) मूळ (२) खोड
(३) पान (४) फळ

६३. आशिया खंडातील सर्वात लांब रेल्वे बोगदा कुठे आहे ?

(१) सिंधुदुर्ग (२) रायगड
(३) रत्नागिरी (४) ठाणे

६४. बायोगॅस कशापासून मिळतो?

(१) कचरा (२) दुकानातून
(३) शेण (४) रॉकेल

६५. खालील वाक्यात कोणता वाक्प्रचार वापराल ते लिहा ?
पानीपतच्या लडाईमध्ये दत्ताजी शिंदे लढता लढता मरण पावले -

(१) धूम ठोकणे (२) धूळ चारणे
(३) धारातीर्थी पडणे (४) रामराम ठोकणे

६६. फेब्रुवारी २१०० या महिन्यात किती दिवस असतील ?

(१) २९ (२) २८
(३) ३१ (४) ३०

६७. तंबाखू, ऊस, हळदी ही तीन नगदी पिके मोठ्या प्रमाणात कोणत्या खोऱ्यात घेतात?

(१) कृष्णा (२) प्रवरा
(३) वर्धा (४) गोदावरी

६८. 'अक्काबाईचा फेरा' या वाक्प्रचाराचा अर्थ सांगा.

(१) अत्यंत गरीब होणे (२) अंधश्रद्धा वाढीस लागणे
(३) दुःखी होणे (४) वारंवार अपयश येणे

६९. 'राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी' (NDA) कोणत्या शहरात आहे ?

(१) नवी दिल्ली (२) बंगळूर
(३) मुंबई (४) पुणे (खडकवासला)

७०. 'उदक सोडणे' - या वाक्प्रचाराचा अर्थ सांगा.

(१) पूर्णपणे त्याग करणे.
(२) मालकी हक्क सोडणे
(३) घटस्फोट देणे
(४) यापैकी नाही

७१. 'स्वावलंबी शिक्षण' हे या संस्थेचे ध्येय आहे.

(१) हिंगणे स्त्री-शिक्षण संस्था
(२) रयत शिक्षण संस्था
(३) स्वामी विवेकानंद संस्था
(४) यापैकी नाही

७२. एका क्रिकेट स्पर्धेत भारताच्या प्रत्येक खेळाडूने निर्धारीत षटकात २७५ धावा केल्या. प्रतिस्पर्धी पाकिस्तान संघातील फक्त ८ खेळाडूच बाद झाले. त्यांनी सरासरी ३२ धावा केल्या व ९ वा नाबाद खेळाडूने १९ धावा काढल्या. तर वरील सामना कोणत्या संघाने जिंकला असेल?

(१) भारत (२) पाकिस्तान
(३) टाय झाला (४) माहिती अपूर्ण

७३. ... हे सह्याद्रीचे सर्वात उंच शिखर आहे.

(१) कळसुबाई (२) महाबळेश्वर
(३) महादेव (४) धूपगड

७४. 'षड्रिपू' चा विग्रह करा.

(१) षट् + डिपू (२) षट् + रिपू
(३) ष + ड्रिपू (४) षड + रिपू

७५. महाराष्ट्र राज्यातील ऐतिहासिकदृष्ट्या प्रसिद्ध 'अजिंठा-एलोरा' लेण्या कोणत्या जिल्हयात आहेत?

(१) नांदेड (२) नाशिक
(३) औरंगाबाद (४) अकोला

Chief Accountant to the
Conservator of Fo...